REGISTERED No. B. 3434




# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १६ जून, १९४८ अंक २४

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८′—१०″)
संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

# विविध माहिती

**औषधें मोफत देण्याची सरकारी योजना**—ऑस्ट्रेलियाच्या सरकारनें तेथील सर्व जनतेस औषधें मोफत देण्याची योजना अंमलांत आणली आहे. डॉक्टरांनीं लिहून दिलेल्या प्रिस्क्रिप्शन-प्रमाणें औषध विक्रेत्यांनीं औषधें तयार करून फुकट द्यावीं आणि त्यांची किंमत सरकारकडून घ्यावी अशी ही योजना आहे. कितीहि श्रीमंत असामी असला तरी त्याला औषध मोफत मिळेल. डॉक्टरांनीं सरकारनें पुरविलेल्या छापील कागदावर औषध योजना लिहून दिली पाहिजे. डॉक्टरांचा प्रस्तुत योजनेस अर्थातच तीव्र विरोध आहे; कारण त्यांतूनच पुढें डॉक्टरी धंद्याचें राष्ट्रीयीकरण निर्माण होण्याची त्यांना भीति वाटत आहे.

**इंग्रजांच्या रशियन बायका**—युद्धकाळांत कित्येक इंग्रज सैनिकांनीं रशियन युवतींशी विवाह केले. ह्या युवतींना आपल्या पतींकडे इंग्लंडमध्यें पाठविण्यास रशियाचें सरकार तयार नाहीं. ह्याला उत्तर म्हणून, ग्रेट ब्रिटननें तेथेंच सध्या असलेल्या इंग्रजांच्या रशियन बायकांना हद्दपार करावें, असें लॉर्डांच्या सभेंत लॉर्ड व्हॅन्सिटार्ट ह्यांनीं सुचविलें. परंतु लॉर्ड पॅकेनहॅम ह्यांनीं सरकार-तर्फे खुलासा करून ही सूचना अमान्य केली. ह्या विषयीं ब्रिटिश सरकारनें रशियन सरकारास १८ वेळा विनवण्या केल्या आहेत!

**हिंदुस्थानची सही झाली**—संयुक्तराष्ट्र संघटनेनें घडवून आणलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापारी करारावर ९ जून रोजीं हिंदुस्थानातर्फे डॉ. पिले ह्यांनीं सही केली. फ्रान्स, चीन, अमेरिका, ग्रेट ब्रिटन, दक्षिण आफ्रिका, इत्यादि १३ राष्ट्रांच्या आतांपर्यंत त्यावर सह्या झाल्या आहेत.

**कृत्रिम रेशमाचें उत्पादन**—येत्या ऑगस्ट महिन्यापासून मुंबई प्रांतांतील कृत्रिम रेशमाचें उत्पादन महिना १ कोटी, १० लाख वारानें वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. सध्या मुंबई प्रांतांतील १० हजार कृत्रिम रेशमाच्या मागांपैकीं ३ हजार माग रेशमी सुताच्या अभावीं बंद आहेत. ह्या रेशमाच्या सुताची ३ कोटी रुपयांची मागणी इंग्लंड, हॉलंड व इटली ह्या देशांकडे करण्यांत आली आहे. पौंडी शिलकेचा ह्यासाठी उपयोग करता आला तर लवकरच रेशमी सुताचा भरपूर पुरवठा होईल असा अंदाज आहे.

**जळणाच्या तेलाचा तुटवडा**—हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या जळणाच्या तेलांत कपात झाल्यामुळें नवीन निघणारे कारखाने व वहातुक ह्यांची पंचाईत होणार आहे. जे कारखाने कोळशाच्या अगर लांकडाच्या भट्ट्या ऐवजीं तेल जाळणाऱ्या भट्ट्या उभारण्याच्या विचारांत होते त्यांनीं तूर्त आपले कार्यक्रम स्थगित करावे असें पत्रक हिंदुस्थान सरकारनें काढलें आहे. कोळसा व लाकूड ह्यांच्या पेक्षा जळाऊ तेल स्वस्त व कार्यक्षम असतें. तथापि, पुरवठ्याची टंचाई लक्षांत घेतां तूर्त दुसरा मार्ग दिसत नाहीं. सरकार जळाऊ तेलाचा अधिक पुरवठा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे.

**अरबांच्या तेलाचा धनी अमेरिका**—युद्धकालांतील परिस्थितीचा फायदा घेऊन अमेरिकन तेलाच्या कंपन्यांनीं सौदी अरेबियांतील ब्रिटिश कंपन्यांच्या तेल काढण्याच्या सर्व सवलती जवळ जवळ हस्तगत केल्या आहेत. युद्धापूर्वी अरेबिअन सरकारचा खर्च मक्का–मदिनेला येणाऱ्या यात्रेकरूंवरील कर, ब्रिटिश तेल कंपन्यांकडून मिळणारी रॉयल्टी व व्यापारी कर्ज ह्यांच्या जमेतून होत असे. युद्धकाळीं यात्रेकरू बंद झाले आणि अरेबिआचा राजा इब्न सौद ह्यानें ब्रिटनमार्फत अमेरिकेकडून डॉलर्स घेण्यास सुरवात केली. अखेर, ब्रिटिश तेल कंपन्यांकडून सर्व सवलती अमेरिकन कंपन्यांनीं खरेदी केल्या.

**नागरी विमान वहातुकींत वाढ**—हिंदुस्थान सरकारच्या वहातुक खात्यानें नागरी विमान वहातुकीचा १९४७ मधील पहिल्या सहा महिन्यांचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. ह्या अहवालावरून असें दिसून येतें कीं, विमानांनीं केलेल्या प्रवासांत गेल्या वर्षीपेक्षा १०० टक्के वाढ झाली आहे. त्याचप्रमाणें वजन नेण्यांत ७७ टक्के वाढ झाली आहे. हिंदुस्थानची फाळणी झाली त्यावेळीं नागरी विमान वहातुक करणाऱ्या एकूण २३ कंपन्या होत्या. त्यांचें भांडवल ४२ कोटींवर होतें. सर्व कंपन्यांची मिळून १६६ विमानें होतीं. नौकर वर्गांत २२९ वैमानिक व १३० इतर तंत्रज्ञ होते.

**सुएझ कॅनॉल बोर्डावर अमेरिकन डायरेक्टर**—सुएझच्या कालव्याची व्यवस्था सुएझ कॅनॉल कंपनी पहाते. ह्या कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे ३२ सभासद असतात. सध्या फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, इजिप्त, नेदरलंडस, ह्या देशांचे प्रतिनिधी कंपनीच्या बोर्डावर आहेत. त्यावर आतां अमेरिकेच्या प्रतिनिधींसहि स्थान मिळालें आहे. कालव्याचा उपयोग करणारांत अमेरिकेचा आतां दुसरा अनुक्रम लागतो.

**रशिआंत सुबत्ता होऊं लागली**—गेल्या डिसेंबरमध्यें रशिआंत वस्तूंच्या किंमती प्रथम उतरविण्यांत आल्या. त्यानंतर आता पुन्हां किंमती उतरविण्यांत आल्या असून त्यामुळें रशिअन नागरिकांचें जीवन अधिक सुखावह झालें आहे. सोव्हिएट रशिआंतील वृत्तपत्रें ह्या घटनेचे स्वागत करीत असून भांडवलशाही देशांतील सामान्य माणसाचें जीवित तुलनेनें अधिक कष्टमय होत असल्याचें लिहित आहेत. रशिआच्या औद्योगिक पुनर्घटनेलाही उतरलेल्या किंमतीमुळें मदत होत आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

नं. २० साबण बार सोप आणि वडी वापरा
माणिक सोप वर्क्स, कराड (जि. सातारा)

# अर्थ

बुधवार, ता. १६ जून १९४८



प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## औद्योगिक विकास व परराष्ट्रीय भांडवल

आशिआंतील व अतिपूर्वेकडील देशांच्य औद्योगिक विकासासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे प्रयत्न करण्यांत येत आहेत. ह्या संघटनेच्या आशिआ खंडाच्या समितीपुढें अमेरिकेचे हिंदुस्थानांतील वकील मि. ग्रेडी, ह्यांनीं अमेरिकन शिष्टमंडळाचे नेते ह्या नात्यानें केलेलें भाषण मनन करण्यासारखें आहे. आशिआंतील राष्ट्रांचा औद्योगिक विकास झपाट्यानें होण्यासाठी परकीय भांडवलाची व तज्ञांची जरूरी आहे ही गोष्ट सर्वमान्य आहे. तथापि, अशा मदतीवांचून औद्योगिक प्रगति अडून बसेल असें मात्र नाहीं; आणि डॉ. ग्रेडी ह्यांनीं हा मुद्दा मान्यही केलेला आहे. परकीय भांडवलाची मदत पाहिजे असेल तर त्या भांडवलाला शाश्वतीची हमी आणि भांडवलावर योग्य तो नफा सुटला पाहिजे असें त्यांनीं बोलून दाखविलें. हिंदुस्थान सरकारनें आपलें औद्योगिक धोरण नुकतेंच जाहीर केलें आहे. त्या धोरणांत भांडवलाला—मग ते देशी अगर परदेशी कोठलेंहि असो—बुजण्यासारखें कांहीं आहे असें म्हणतां येणार नाहीं. मग डॉ. ग्रेडी ह्यांना आणखी स्पष्ट आणि दूरगामी स्वरूपाचीं आश्वासनें पाहिजे असलीं तर गोष्ट वेगळी.

एखाद्या देशाला परकीय भांडवलाच्या वर्चस्वाची भीति वाटत असेल तर त्यानें कायदे करून परकीय भांडवल देशांत येऊ देऊं नये अशीही सूचना डॉ. ग्रॅडी ह्यांनीं केली आहे. ही सूचना धमकीवजा असल्याचा संशय सध्याच्या परिस्थितींत आल्याशिवाय रहात नाहीं. कारण, हिंदुस्थानच्या व आशियाच्या औद्योगिक वृद्धीसाठी ज्या भांडवली मालाची गरज आहे, तो माल आज अमेरिकेशिवाय दुसरा देश देण्याच्या परिस्थितींत नाहीं. इंग्लंड, झेकोस्लोव्हाकिआ, स्वित्झरलंड ह्या देशांकडून थोडाबहुत भांडवली माल मिळूं शकेल; पण, त्यानें हिंदुस्थानची सर्व गरज भागणार नाहीं. अशा परिस्थितींत डॉ. ग्रॅडी ह्यांनीं दिलेली सूचना हिंदी उद्योगपतींना मित्रत्वाची वाटणें कठीण आहे. अमेरिकन भांडवलाला हिंदुस्थान सरकारकडून काय आश्वासनें पाहिजेत हें डॉ. ग्रॅडी ह्यांनीं स्पष्टपणें बोलून दाखविलें असतें तर वाटाघाटींचा दरवाजा तरी खुला झाला असता. मोघम बोलणीं करण्यांत वेळ दवडून आर्थिक प्रगति खुंटाविणें हिंदुस्थानला यापुढें परवडणारें नाहीं. केवळ अर्थशास्त्रीय दृष्टीनें डॉ. ग्रॅडी ह्यांनीं उपस्थित केलेल्या एका मुद्याचा परामर्ष घेणें जरूर आहे. एखाद्या देशांतून शेतीच्या मालाची निर्यात प्रामुख्यानें होत असेल तर तेवढ्यावरून तो देश वासाहतिक अर्थव्यवस्थेचा म्हणणें बरोबर होणार नाहीं असें डॉ. ग्रॅडी ह्यांनीं सुचविलें आहे आणि आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यांनी अमेरिकेचें उदाहरण दिलें आहे. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्यांत झालेल्या दोन युद्धांची आर्थिक पार्श्वभूमि ज्यांना माहीत आहे, त्यांची डॉ. ग्रॅडी ह्यांच्या युक्तिवादानें फसवणूक होणार नाहीं. अमेरिकेला आपले उद्योगधंदे वाढविण्यासाठी जसा राजकीय झगडा करावा लागला तसाच तो आजवर हिंदुस्थानलाही करावा लागला. अमेरिकेची औद्योगिक वृद्धि होत असतांना जी जागतिक परिस्थिति तिला लाभली ती मात्र आज नाहीं. उलट, १५० वर्षें हेतुपूर्वक मागासलेली ठेवली गेलेली हिंदी अर्थव्यवस्था अजूनही तशीच ठेवण्याचे प्रयत्न होत आहेत. म्हणून हिंदुस्थाननें आपल्या कच्च्या मालाचा उपयोग निर्यातीसाठी न करता प्रत्यक्ष उत्पादनासाठी देशांतच शक्य तो करावा हीच औद्योगीकरणाची दिशा योग्य आहे.

### साखरेच्या उत्पादनाचा अंदाज

कानपूर येथील साखरविषयक संस्थेनें १९४७-४८ च्या हंगामांतील, उंसापासून उत्पादन केल्या जाणाऱ्या साखरेचे अंदाजी आंकडे प्रसिद्ध केले आहेत. ह्या अंदाजाप्रमाणें हंगामांत १० लक्ष, ५७ हजार टन साखर उत्पन्न होईल. गेल्या मार्च महिन्यांत जो पहिला अंदाज करण्यांत आला होता तो ९ लाख, २१ हजार टनांचा होता. पहिल्या अंदाजांत सुद्धा अंदाजापेक्षा अधिक वाढ होईल असें सूचित करण्यांत आलें होतें. साखरेच्या किंमती चढ्या राहिल्या आणि गुळाच्या कमी राहिल्या तर साखरेची निर्मिती अधिक होणार हें उघडच होतें. कारण ह्या किंमतींतील फरकामुळें अधिक उंस साखरेच्या उत्पादनाकडे लावला जाणें क्रमप्राप्तच होतें. उत्पादनांत झालेल्या वाढीपैकी १ लक्ष, ६ हजार टनांची वाढ संयुक्त-प्रांत व बिहार ह्या प्रांतांत झाली. बाकीची वाढ इतर प्रांतांतून झाली. साखर कारखान्यांचा हंगामही ह्या सालीं १९४६-४७ सालापेक्षा अधिक काळ चालला. संयुक्त प्रांत व बिहार ह्या प्रांतांतून ४६-४७ सालीं कारखाने सरासरीनें अनुक्रमें ९७ व ७० दिवस चालले. गेल्या हंगामांत ते १०८ व ७७ दिवस चालले. कारखाने चालवण्याची अखिल भारतीय सरासरी १०६ दिवसांची आहे. ४६-४७ सालीं ती ९३ दिवसांची भरली. ऊंस गाळण्याशी साखरेचें जें प्रमाण पडतें त्यांतही वाढ होईल अशी अपेक्षा आहे. पहिल्या अंदाजांत संयुक्तप्रांत व बिहार मधील साखरेचा उतारा अनुक्रमें ९.८७ टक्के व १०.१२ टक्के होईल असे गृहीत धरलें होते. परंतु दुरुस्त अंदाजाप्रमाणें हा उतारा ९.८९ टक्के आणि ११.०५ टक्के होईल असें वाटतें. हिंदुस्थानांतील सर्व कारखान्यांचा मिळून साखरेचा उतारा १०.१० टक्के होईल असा अंदाज आहे. १९४६-४७ सालीं उतारा ९.८८ टक्के पडला होता.

**ब्रिटिश पार्लमेंटची पहिली स्त्री अध्यक्ष**—कॉमन्स सभेच्या अध्यक्षस्थानीं स्त्रीला काम करण्याचा पहिला मान नुकताच मिसेस फ्लॉरेन्स पेटन ह्या मजूर पक्षाच्या स्त्री सभासदाला मिळाला. सभागृहाच्या नेहमीच्या अध्यक्षानें एका चर्चेच्या वेळीं अध्यक्षपदीं बसण्यासाठी ह्या बाईची निवड केल्यानें हा प्रसंग घडून आला. कॉमन्सच्या सभासदांनीं स्त्री अध्यक्षांचें टाळ्या वाजवून स्वागत केलें. पण सभेस आपले यजमान (तेहि पार्लमेंटचे सभासद आहेत) हजर राहूं शकले नाहींत म्हणून बाईंना वाईट वाटलें अशी बातमी आहे.

## सहकारी कंझ्यूमर्स स्टोर्स

१९४४-४५ च्या मानानें १९४५-४६ मध्यें मुंबई प्रांतांतील कंझ्यूमर्स स्टोर्सची संख्या ९ नें वाढून ती ४५६ ची ४६५ झाली. सभासद-संख्या, खेळतें भांडवल, खरेदी, विक्री ह्या सर्व बाबतींत प्रगति झाली परंतु व्यवस्थेचा खर्चहि वाढल्याकारणानें नफ्याचा आकडा ९०½ हजार रुपयांनीं कमी झाला. खालील तक्ता पहा:—

| | १९४४-४५ | १९४५-४६ |
|---|---|---|
| सोसायटयांची संख्या | ४५६ | ४६५ |
| सभासदांची संख्या | १,२५,९८८ | १,३२,५९० |
| | रु. | रु. |
| खेळतें भांडवल | ४८,२५५६६ | ५५,११,०७२ |
| विक्री | ५,२२,१३,१८३ | ५,४२,०७,४२५ |
| खरेदी | ४,७६,९७,६१२ | ५,२५,०२,११३ |
| व्यवस्था खर्च | २०,७७,६३९ | २२,२५,५०८ |
| नफा | ९,३१,९७८ | ८,४१,५४३ |

को. क्रेडिट व मल्टिपर्पज सोसायटयांमार्फत ३० जून १९४६ रोजीं १,१९५ रेशन माल विक्री केंद्रें चालविण्यांत येत होतीं, त्यांचा वरील आकड्यांत समावेश नाहीं; तथापि ह्या केंद्रांच्या संख्येवरून फेअर प्राइस दुकानें व रेशन दुकानें चालविण्यांत सहकारी संस्थांनीं केवढा मोठा भाग घेतला होता, हें दिसून येईल. कंझ्यूमर्स सोसायटयांचा, नियंत्रित माल विक्रीचा धंदा कमी झाला तरी त्यांचें उपयुक्त कार्य चालू रहावें ह्या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत आला.

सहकारी स्टोर्सची संख्या, सभासद संख्या व उलाढाल ह्या सर्व बाबतींत अहमदाबाद विभागाचा पुढाकार कायम आहे. मुंबई प्रांतांतील ४६५ स्टोर्सपैकी २१२ स्टोर्स तेथें आहेत आणि त्यांचे ७६,३८४ सभासद असून त्यांचे खेळतें भांडवल २६,१५,५४७ रु. आहे. ह्या २१२ स्टोर्सनीं एकूण ३,३०,१९,८३१ रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली. वरील तक्त्यांतील आकड्यांशीं ह्या आकड्यांची तुलना केली असता ती बोधप्रद होईल.

मुंबई भागांतील इस्मालिया को. जनरल स्टोर्स, कच्छी मेमन को. जनरल स्टोर्स आणि दक्षिण हिंदुस्थानी लोकांनीं चालविलेले दोन स्टोस ह्यांच्याहि समाधानकारक कार्याचा उल्लेख सहकारी खात्याच्या रिपोर्टांत करण्यांत आला आहे. जळगांव मुस्लिम कंझ्यूमर्स स्टोर्स व पुणें येथील साऊथ इंडियन को. कंझ्यूमर्स सोसायटी ह्यांचाहि अनुकूल निर्देश रिपोर्टांत आहे.

## हिंदु धार्मिक विश्वस्त निधींचा उपयोग

### डॉ. जयकरांचें मत

मुंबई प्रांतांतील धार्मिक व धर्मादाय स्वरूपाच्या विश्वस्त निधींची उपयुक्तता वाढविण्याबाबत सुधारणा सुचविण्याचें काम न्यायमूर्ति तेंडोलकर समितीकडे सोपविलें आहे. ह्या समितीपुढें साक्ष देतांना, डॉ. जयकर ह्यांनीं सांगितलें, कीं विश्वस्त निधि निर्माण करणाऱ्यानें पैशाचा विनियोग कसा करावा, हा त्याचा स्वतःचा प्रश्न आहे. मीं माझ्या मालमत्तेचा विनियोग कशा रीतीनें करावा, हें सांगण्याचा सरकारास अधिकार देण्यास माझा विरोध आहे. दात्याचा हेतु जोंवर सार्वजनिक नीतिमत्तेस सोडून नाहीं, तोंपर्यंत त्याच्या इच्छेवर सरकारनें बंधन घालण्याचें प्रयोजन नाहीं. धार्मिक संस्थांजवळ शिल्लक राहिलेला पैसा धार्मिक कारणांसाठीच वापरला गेला पाहिजे.

### महागाई कशी वाढत आहे ?

| | ऑगस्ट १९३९ अखेरचें वर्ष | एप्रिल १९४७ | एप्रिल १९४८ | शतमानानें वाढ (+) अगर घट (−) |
|---|---|---|---|---|
| खाद्य पदार्थ | १०० | २७९.१ | ३४८.८ | +२४.६ |
| औद्योगिक कच्चा माल | १०० | ३५६.२ | ४१४.६ | +१६.४ |
| अर्धा-पक्का तयार माल | १०० | २४९.७ | २९९.८ | +२०.१ |
| पक्का माल | १०० | २७०.१ | ३२५.८ | +२०.६ |
| इतर माल | १०० | ४६७.६ | ४७८.५ | + २.३ |
| सर्व प्रकारचा माल | १०० | २८९.६ | ३४८.० | +२०.२ |

को. ट्रेनिंग कॉलेज, पुणें—वरील कॉलेज १६ जून ऐवजी २१ जून रोजीं सुरू होणार आहे.

**हिंदुस्थानसाठी रेल्वे-एंजिनें**—अमेरिकेंतील बाल्डविन लोकोमोटिव्ह वर्क्स ह्या कारखान्याकडे १०० रेल्वे एंजिनांची मागणी हिंदुस्थान सरकारतर्फे नोंदण्यांत येणार आहे. हीं एंजिनें नवीन प्रकारचीं व रुंद रुळावर चालणारीं आहेत. एंजिनांची किंमत १ कोटी, २० लाख डॉलर्स होईल. ह्याशिवाय, एका कॅनेडिअन कारखान्याकडेही १०० एंजिनांची मागणी नोंदण्यांत आली आहे. कॅनेडिअन एंजिनांची किंमत १ कोटी, ३० लाख डॉलर्स होईल.

**डॉ. ग्रॅडींची नवी नेमणूक**—हिंदुस्थानमधील व नेपाळमधील अमेरिकेचे वकील डॉ. एफ. ग्रॅडी ह्यांची नेमणूक ग्रीसमधील अमेरिकेचे वकील म्हणून झाली आहे.


## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें.

ह्या विद्यालयाचा तिसरा सहामाही शिक्षणाचा वर्ग ता. १ जुलै, १९४८ पासून नं. ५, बैरामजी जिजीभाई रोड, पुणें नं. १ ह्या ठिकाणीं सुरू होणार आहे. कमींतकमी मॅट्रिक पास झालेल्यांना प्रवेश मिळेल. त्याचप्रमाणें, सहकारी खात्यांतील व सहकारी संस्थांतील वरील शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनीं ता. २५ जूनचे आंत अर्ज करावे. फक्त ५० विद्यार्थी घेणें आहेत. अधिक माहितीसाठीं लिहावें.

११ जून, १९४८ } बा. वि. कुंभारे सुपरिंटेंडेंट.



कराड तालुका शेतकी सुधारणा संघ लि., कराड.

वार्षिक सधारण सभेची

## नोटीस

कराड १२ जून १९४८

या संघाची वार्षिक साधारण सभा रविवार ता. २७ जून १९४८ रोजीं दुपारीं ३ वाजतां कराड येथें कल्याणी बिल्डिंगमध्यें आमदार यशवंतराव चव्हाण, पार्लमेंटरी सेक्रेटरी, गृहखातें, मुंबई यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे.

तरी सभासदांनीं अगत्य हजर रहावें अशी विनंती आहे. सोसायटीचे सभासदांनीं आपले प्रतिनिधींचीं नांवें ठरावासह मीटिंगचे आंत ऑफिसांत मिळतील अशा तऱ्हेनें समक्ष अगर पोस्टानें पाठवावेत.

रामराव बाळकू पाटील — संभाजीराव मारुतीराव थोरात
राजाराम रामचंद्र पाटील — प्रेसिडेंट
ऑ. सेक्रेटरी

## सहकारी अर्बन बँकांची प्रगती

१९४५-४६ मध्यें मुंबई प्रांतांतील अर्बन बँकांची बरीच प्रगति झाली. त्यांची संख्या ८७ ची ९६ होऊन सभासदांची संख्या ८२,५०८ ची ९१,२४७ झाली. त्यांच्या व्यवहाराचा तुलनात्मक तक्ता खाली दिला आहे:–

| | १९४४-४५ | १९४५-४६ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| शेअर भांडवल | ५३,१५,६१० | ६१,७२,३०८ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ५४,८९,३१५ | ६४,२१,४८९ |
| खेळतें भांडवल | ६,९०,४२,०६० | ८,८६,७९,८०० |
| सभासदांच्या ठेवी | ३,१५,८५,६६६ | ३,७४,१३,१०१ |
| दर सभासदाची सरासरी ठेव | ३८३ | ४१० |
| बिगर-सभासदांच्या ठेवी | २,६१,७२,५१० | ३,३७,६१,३४४ |
| मध्यवर्ती बँकांचीं कर्जें व ठेवी | ६,८६,३८२ | ९,०८,१८७ |
| नफा | ७,०२,५१९ | ८,७५,६१० |
| खेळत्या भांडवलाशीं नफ्याचें प्रमाण | १.०१% | ·९९% |
| व्यवस्था खर्च | ७,४२,२०४ | ९,१६,७३० |
| खेळत्या भांडवलाशीं खर्चाचें प्रमाण | १·०७% | १·०३% |
| कर्जाचा दर | ४ ते ९¾ | ४ ते ९¾% |
| ठेवींचा दर | २ ते ४% | ½ ते ४% |
| येणें कर्ज | १,६४,०९,०१२, | १,९०,९५,२६८ |
| थकबाकी | १७,२१,१४० | १९,७९,७४० |
| थकबाकीचें कर्जाशीं प्रमाण | १०·४% | १०·३% |

### कार्यक्षम व आदर्श बँका

मुंबई प्रांतांतील अर्बन बँकाचें खेळतें भांडवल आतां सुमारें ९ कोटी रु. आहे. बहुतेक बँकांना आपला बराचसा पैसा सरकारी व तत्सम रोख्यांत कमी व्याजानें गुंतवणें भाग पडलें. थकबाकींचे संबंधांत सुधारणा फारच थोडी दिसते. व्याजाचे दर उतरविले तरी ठेवींचा ओघ कायम राहिल्यानें कित्येक बँकांचे बाबतींत ८ पटीचा नियम सैल करावा लागला. कार्यक्षम व्यवहाराचे व उपयुक्त कामगिरीचे आदर्श म्हणून, सरकारी रिपोर्टांत खालील बँकांचा उल्लेख करण्यांत आला आहे:—

(१) इस्माइलिआ, मुंबई. (२) सारस्वत, मुंबई. (३) बॉंबे मुस्लिम, मुंबई. (४) सुरत पीपल्स. (५) अंकलेश्वर अर्बन. (६) भुसावळ पीपल्स. (७) कॉसमॉस अर्बन, पुणें. (८) सदर्न मराठा, धारवाड. (९) सिद्धेश्वर अर्बन, विजापूर. (१०) पंढरपूर अर्बन. (११) पायोनिअर अर्बन, बेळगांव. (१२) कराड अर्बन. (१३) रत्नागिरी अर्बन. (१४) चिपळूण अर्बन.

**शेअर दलाल, डॉन ब्रॅडमन**—डॉन ब्रॅडमन, हें नांव क्रिकेटपटू म्हणून जगजाहीर आहे. परंतु मि ब्रॅडमन हे शेअर ब्रोकर असून ॲडिलेड स्टॉक एक्सचेंजचे सभासद आहेत, ही गोष्ट फारच थोड्यांस माहीत आहे. ते कित्येक ऑस्ट्रेलियन कंपन्यांचे डायरेक्टर आहेत. ईगल स्टार इन्शुअरन्स कंपनीच्या सा. ऑस्ट्रेलियन बोर्डाचे सभासद म्हणून त्यांची नुकतीच नेमणूक झाली.


**नानूज् ब्रास वर्क्स लि., मुंबई**

अधिकृत भांडवल २५,००,००० रु. | विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,००० रु.

प्रत्येक शेअर ५० रु.चा. अर्जासोबत १२ रु. ८ आ. ॲलॉटमेंटनंतर १२ रु. ८ आ.

**डायरेक्टर बोर्ड**

सर माधवराव जी. देशपांडे, नागपूर (चेअरमन)
श्री. जी. आर. साठे, पुणें.
रा. ब. जी. जी. डेंबिकर, बारामती
शेठ वसनजी हि. पोपट, मुंबई.
शेठ चरणदास व्ही. मरिवाला, मुंबई.
श्री. एम. व्ही. पोतनीस, मुंबई.
श्री. डी. एस. भावे, पुणें.
श्री. के. जी. कर्णिक, मुंबई.

**रजिस्टर्ड ऑफिस**


**२६९ ए, गिरगांव रोड, ठाकुरद्वार, मुंबई ४.**

श्री. के. जी. कर्णिक, ह्यांचेकडून नानूज् ब्रास वर्क्स नांवाखालीं चालविण्यांत येणारा धंदा विकत घेऊन हॉस्पिटल्स, लॅबोरेटरीज, दवाखाने, ऑपरेशन थिएटर्स, इत्यादींस लागणाऱ्या जिनसा व उपकरणें तयार करण्याचा व पुरविण्याचा व्यवहार प्रस्तुत कंपनी मुख्यत: करणार आहे. वरील ब्रास वर्क्सचा धंदा ५० वर्षें चालू आहे; त्यांत सुधारणा व वाढ करण्यांत यावयाची आहे.

**शेअर्स, वगैरेसाठी पत्रव्यवहार करा:—**

**श्री. ए. एस. साठे.** "उल्हास," जंगली महाराज रोड, पुणें ४

**मेसर्स कर्णिक अँड भावे लि.**
मॅ. एजंट्स


**अधिक धान्य पिकविण्याची योजना**

—यशस्वी होण्यास—

**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**

**हें अमोघ साधन आहे.**

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## औद्योगिक केंद्रांची ठेवण व मर्यादा

(भा. म. काळे)

अमेरिकन मशीन कंपनीचे मि. ग्लेन ओव्हर्टन ह्यांनीं कलकत्ता येथें एका भाषणांत अमेरिकेच्या अनुभवावरून औद्योगिक केंद्रांची ठेवण व मर्यादा याबद्दल कांहीं विचार नुकतेच व्यक्त केले, ते आज हिंदलाहि एका अनुभवी देशाचे प्रत्यक्ष अनुभवाचे बोल म्हणून विचारार्ह आहेत. मजूर वर्गामध्यें स्वास्थ्य नांदावयाचें असल्यास एकाच ठिकाणीं फार मोठी औद्योगिक वाढ होऊं देतां कामा नये. खुद्द अमेरिकेमध्यें ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यामुळें बरेंच असमाधान निर्माण झालें आहे. साधारणपणें एक हजार कामगार वर्ग, त्यांची कारखान्याची जागा, त्यांचें निवासस्थान हीं सर्व एका लहान केंद्रांत समाविष्ट होतील तर कामगार वर्ग अधिक सुखी होऊन त्याची उत्पादनक्षमताहि वाढूं शकेल. उद्योगधंद्यांच्या वाढीचा अतिरेक व शहरीकरण ह्या दोनहि गोष्टी टाळल्या पाहिजेत. २५ वर्षांपूर्वी सुमारें ८० टक्के अमेरिकन जनता खेडेगांवांतून रहात असे, परंतु २५ वर्षांनंतर ५० टक्के लोक खेडेगांवांतून व ५० टक्के शहरांतून राहूं लागले. अगदी अलिकडे ८० टक्के लोक शहरांत राहतात व २० टक्के खेडेगांवांतून राहतात. त्या परिस्थितीचा परिणाम अमेरिकन मजूरवर्गाला भोगावा लागत आहे. कारखान्यांतून होणारें उत्पादन व शेतीपासून होणारें उत्पादन यामध्येंही कांहीं तरी समतोलपणा राखला गेला तर आर्थिक स्वास्थ्य नांदण्यास मदत होते. वाजवीपेक्षा जास्त औद्योगिक विकास झाल्यामुळें, आर्थिक मंदीच्या काळांत उद्योगधंदे व शेती ह्या दोहोंसहि बिकट परिस्थितीला तोंड द्यावें लागतें. शेती समृद्ध राहील तरच उद्योगधंद्यांची परिस्थिति समाधानकारक व स्थिर राहूं शकते असा अमेरिकेचा अनुभव आहे. तेव्हां शेती व उद्योगधंदे ह्या दोहोंवर सारखी मदार ठेवणें योग्य ठरणार आहे. अमेरिकेनें उत्पादनाचा उच्चांक गांठला व तीं भांडवलशाही कोडोपती निर्माण करूं शकली तरीही बेकारी, मजुरांचें अस्वास्थ्य, ह्या गोष्टी अमेरिका टाळूं शकत नाहीं. लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्य ह्या उच्च तत्त्वांच्या दृष्टीनें अमेरिकन कामगारवर्गाचें जीवन असावें तसें सुखी नाहीं.

मि. ग्लेन ओव्हर्टन यांचे अमेरिकन परिस्थितीबद्दलचे विचार हिंदनें विचार करण्यासारखे आहेत. आजच आपणापुढें बृहन् मुंबई योजनेचा प्रश्न आहे. मर्यादेपलीकडे होत चाललेली मुंबई शहराची वाढ आर्थिक व सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीनें कितपत हितावह ठरेल हें काळाच्या ओघांतच अनुभवानें दिसून येणार आहे. विकेंद्रीकरणाच्या सर्वमान्य तत्त्वाच्या दृष्टीनें बृहन् मुंबईसारख्या योजना विसंगत आहेत. भावी काळांत युद्धें झाल्यास वैमानिक हल्ल्यांपासून संरक्षणाची तरतूद केली पाहिजे. या दृष्टीनेंहि कापडाचा धंदा किंवा इतर कोणताहि धंदा एकाच शहरांत केंद्रीभूत होणें योग्य ठरणार नाहीं. सामाजिक स्वास्थ्य किंवा शांततामय जीवन साधावयाचें असल्यास अति मोठीं औद्योगिक केंद्रें त्याज्यच समजलीं पाहिजेत. मानवी सौख्य, संपत्ति व उपभोगाचीं साधनें यांत प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीनें भर घालणें हें ध्येय औद्योगिक विकास करीत असतांना आपल्या दृष्टीसमोर पाहिजे. विज्ञान शास्त्रांतले आधुनिक सुखसोई प्राप्त करून देणारे कित्येक शोध अशाच स्वरूपाचे आहेत कीं, प्रत्येक कुटुंबाच्या वाटणीला मुबलक जागा येत असेल तरच त्यांचा तुलनात्मक दृष्ट्या जास्त उपभोग घेतां येतो. न्यू यॉर्क शहराची प्रचंड वाढ भौगोलिक परिस्थितीमुळें, म्हणजे विस्तारोपयोगी क्षेत्राच्या अकुंचितपणामुळें, गगनचुंबी इमारती बांधून करावी लागली. सुदैवानें तशी परिस्थिति आज हिंदमध्यें कोठेंहि नाहीं. हिंद सरकार प्लॅनिंग कमिशन नेमणार आहे. ह्या कमिशननें लक्ष निरनिराळ्या उद्योगधंद्यांची वाढ कोणकोणत्या ठिकाणीं व जास्तींत जास्त किती मर्यादेपर्यंत किंवा विस्तारापर्यंत करतां यावी या गोष्टीकडे पाहिजे. त्याचप्रमाणें, युद्ध तंत्राच्या दृष्टीनें महत्वाचे धंदे निरनिराळ्या ठिकाणीं विखुरलेले असले पाहिजेत. मजुरविषयक कायदे, मालक-मजूर यांच्या संमिश्र कमिट्या, संप-टाळण्याबद्दल कायदे, नफ्याची वाटणी मालक मजुरांमध्यें करून देणारे नियम, लेबर वेलफेअर सेंटर्स, इ. गोष्टी मजुरांचा प्रश्न पूर्णपणें सोडवूं शकणार नाहींत. उत्पादनाची केंद्रें कांहीं एका प्रमाणांत राखणें, शहरांची भरमसाट वाढ होऊं न देणें, कृषि-माल व कारखानी-माल यांत समतोलपणा राखणें, याहि गोष्टी औद्योगिक केंद्रांच्या बाबतींत हिंद सरकारला विचारांत घ्याव्या लागतील.

---

**इंजनें खरीदण्यासाठी इंग्लंडची वारी**—हिंदी रेल्वेजसाठी इंजनें व इतर सामुग्री खरीदण्यासाठी रेल्वेजचे चीफ कमिशनर ग्रेट ब्रिटनकडे जाण्यास लवकरच निघणार आहेत.

**ब्रिटिश राजाला नातवंडाचा योग**—ग्रेट ब्रिटनच्या राज्याच्या गादीची वारस, प्रिन्सिस एलिझाबेथ, हिला येत्या ऑक्टोबरमध्यें मातृपद प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे. ६½ महिन्यांपूर्वीं तिचा ड्यूक ऑफ ऍडिंबरोशीं विवाह झाल्याचें प्रसिद्धच आहे. प्रिन्सेस एलिझाबेथ गादीवर येईपर्यंत तिच्या अपत्यांस कोणताहि किताब धारण करतां येणार नाहीं; कारण राजास अजून अपत्य होणार नाहीं, असें कायदा धरून चालत नाहीं. एलिझाबेथ गादीवर बसली, म्हणजे तिचा थोरला मुलगा ड्यूक ऑफ कॉर्नवॉल व धाकटा मुलगा ड्यूक ऑफ रॉथसे आपोआपच होईल. थोरल्यास नंतर प्रिन्स ऑफ वेल्स करण्यांत येईल.

**किंमती मर्यादेंत राखण्यामध्यें यश**—युद्ध समाप्तीनंतर ग्रेट ब्रिटननें जिनसांच्या किंमती वाढूं न देण्यांत इतर देशांचे मानानें उत्कृष्ट यश मिळविलें आहे. १९३९ ते जुलै १९४७ ह्या मुदतींत तेथील किंमती २९% नें वाढल्या. १९१४ ते २० ह्या मुदतीमधील वाढ १५५% होती.

**सिंधी पापडांची अमेरिकेकडे निर्गत**—कुर्ला येथील सिंधी निर्वासित विधवांची 'नारी सेवा सदन' ही संस्था सिंधी पापड बनवून अमेरिकेकडे विक्रीसाठी विमानानें पाठविणार आहे.

---


# DECCAN INSTITUTE OF COMMERCE, POONA.

(Recognised by Government.)

Opens for the 1948-49 Session on Thursday the 24th inst. Students coached up for the G.D.C. and C., L. C. C., D. Com. (I. M. C.), R. A. (1st), G. D. C. and A., A. C. W. A., A. C. C. S., Shorthand and Typewriting. Courses suitable for Non-matriculates, Matriculates and Graduates. Classes in the Morning and Evening. Prospectus free on application to:

Institute's Building,
594, Budhwar Peth,
Jijamata Bag Corner,
Poona 2.

Secretary.

# " भांडवल पुरविणाऱ्या वर्गास प्रोत्साहन द्या "

## लष्करी व आर्थिक सामर्थ्य वाढविण्याची आवश्यकता

### श्री. बिर्ला ह्यांचें युनायटेड कमार्शिअल बँकेच्या वार्षिक सभेंत भाषण

युनायटेड कमर्शिअल बँक लि. कलकत्ता ह्या बँकेचे अध्यक्ष श्री. जी. डी. बिर्ला, ह्यांनीं बँकेच्या ५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेंत हिंदी उद्योगधंद्यांसंबंधीं पुढीलप्रमाणें विचार प्रकट केले:-

देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर परिस्थितींत सुधारणा होऊन राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला चांगलें वळण लागेल, अशी अपेक्षा होती. परंतु, अपेक्षेच्या उलट औद्योगिक उत्पादन घटत चाललें आहे, मालाच्या वहातुकींत अडचणी उत्पन्न झाल्या आहेत आणि वस्तूंच्या विभागणीला अडथळा उत्पन्न झाला आहे. त्याचप्रमाणें सरकारचें पैशाबाबतचें धोरणही स्पष्ट नाहीं. सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितींत हिंदुस्थानच्या रक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा होऊन बसला आहे. त्यामुळें आपल्या अंदाजपत्रकांत त्यावरील खर्च एकसारखा वाढत जाणें अपरिहार्य आहे. पण, आपल्या देशांतील रहाणीचें मान अतिशय कमी प्रतीचें आहे हेंही आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. तें वाढविण्यासाठीं सर्व प्रकारचे प्रयत्न करणें जरूर आहे. शिक्षण, वैद्यकीय मदत आणि सार्वजनिक आरोग्य, ह्या बाबतींत सुधारणा करण्यासाठी अधिक पैशाची गरज आहे. म्हणून मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं आपआपल्या अंदाजपत्रकांत त्यासाठी अधिक तरतूद करावयास पाहिजे.

### उत्पादन वाढ

हिंदुस्थानला आंतरराष्ट्रीय राजकारणांत आपलें कार्य करतां येण्यासाठी एका गोष्टीची अत्यंत आवश्यकता आहे, ती म्हणजे हिंदुस्थानासंबंधीं परदेशांत खरी माहिती प्रसृत करणें. ह्या कार्यासाठी आणि देशाचा औद्योगिक उद्धार करण्यासाठी पैशाची फार गरज आहे. हा पैसा कोठून येणार, हा एक प्रश्नच आहे. हा पैसा मिळविण्याचा एकच मार्ग आहे. उद्योगधंदे वाढविणें आणि त्यांतून उत्पादन वाढविणें हाच तो मार्ग होय. ज्या ज्या मार्गानें आपली उत्पादन शक्ती वाढेल, त्या त्या मार्गाला आपण उत्तेजन दिलें पाहिजे. उलट, ज्या योगानें उत्पादन घटेल त्या प्रत्येक गोष्टीला आपण कसून विरोध केला पाहिजे. आपण आर्थिक दृष्ट्या कमकुवत राहिलों, तर आपलें स्वातंत्र्यहि धोक्यांत आल्याखेरीज रहाणार नाहीं. हिंदुस्थान औद्योगिक उत्पादनांत किती मागासलेला आहे ह्यासंबंधीं मी आपणांस कांहीं माहिती सांगतो. आजच्या जगांत अमेरिका दरमाणशीं दर तासाला एक औद्योगिक युनिट माल निर्माण करूं शकते. ब्रिटन १/२ पेक्षा थोडें अधिक युनिट उत्पादन करू शकते. हिंदुस्थानचा अनुक्रम मात्र शेवटून दुसरा लागतो. हिंदुस्थान १/१० इतकाच माल दर माणशी दर ताशी निर्माण करू शकतो. अधिक सोप्या भाषेंत असें सांगतां येईल कीं, अमेरिकेंत एखादी वस्तू उत्पन्न करण्यास एका माणसाला एक तास काम करावें लागतें. हिंदुस्थानांत तीच वस्तू निर्माण करण्यासाठी १५ माणसांना तासभर खपावें लागतें. हिंदुस्थानांत नैसर्गिक संपत्ति विपुल आहे हें आपणांस माहीतच आहे. देशांत मनुष्यबळही भरपूर आहे. तथापि





नवीन पुष्कळ निघाले, तरी
**तुळजाराम मोदी, सातारा**
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

**निवडक व उत्कृष्ट मासे**
★ मोठे पॉपलेट्स ★ सुरमाई ★ घोळ ★ दाढा ★ रावस
स्थानिक व बाहेरगांवच्या विक्रेत्यांना व हॉटेलसाठीं लागणारे घाऊक व किरकोळ मासे योग्य भावांत मिळतील.
फ्रोझन फूड कंपनी
(१) मुळा रोड, पुणें ३ (२) स्टॉल नं. ४१ कॅन्टोन्मेंट फिश मार्केट, पुणें १

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार






उत्पादन वाढण्यास ह्या गोष्टींबरोबर भांडवली स्वरूपाचा माल, शिस्त व तांत्रिक ज्ञान ह्यांचीही जरूरी आहे. आपण सर्वांनीं खूप काम करण्याचा आणि आपसांतील मतभेद दूर बाजूला ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. १९४४ पासून आपलें उत्पादन घटत चाललें आहे. १९४६ सालीं उत्पादनाची परिस्थिति बिघडली; १९४७ सालीं तर ती त्याहीपेक्षा अधिक वाईट झाली. ह्या सालीं संपामुळें १½ कोटी कामाच्या दिवसांचें नुकसान झालें.

**सोन्याचीं अंडीं घालणारी कोंबडी**

उत्पादनाच्या व्यवसायांत 'मुख्यतः तीन प्रकारच्या लोकांचा संबंध येतो : ( १ ) पैसे गुंतविणारा वर्ग, ( २ ) प्रत्यक्ष उत्पादन करवून घेणारा मॅनेजरचा वर्ग आणि ( ३ ) तिसरा, कामगारांचा वर्ग. उत्पादन जास्तींत जास्त व्हावयाचें असेल तर ह्या तिन्ही वर्गांना काम करण्याला प्रलोभन मिळालें पाहिजे. ह्या तीन वर्गांपैकी पहिला वर्ग भांडवलाचा पुरवठा करतो. १९४७ च्या मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकांत व्यक्त झालेल्या धोरणामुळें ह्या वर्गाला अशाश्वति वाटूं लागली. त्यामुळें उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या भांडवलाचा झराच एकसारखा आटूं लागला आहे. सध्याचे अर्थमंत्री श्री. षण्मुखम् चेट्टी हे ह्या वर्गाचा विश्वास परत मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपल्या उत्पादनवाढीच्या प्रयत्नांत करांच्या पद्धतीला फार महत्व आहे. भांडवल गुंतविणाऱ्या वर्गाला उत्तेजन देण्यासाठी आपल्या करांच्या पद्धतींत सुधारणा होणें आवश्यक आहे. उच्च श्रेणींतल्या उत्पन्नावर प्राप्तीचा कर दिल्यावर हिंदुस्थानांत फक्त ३ टक्के उत्पन्न मालकाजवळ रहातें. अमेरिकेंत तें कमींत कमी २० टक्के रहातें. करांची योग्य पद्धति स्वीकारली तर सरकारला तीपासून अधिक उत्पन्न होतें; कर चुकविण्याची वृत्ति कमी होते; आणि देशांतील उत्पादन वाढल्यामुळें वाढत्या उत्पन्नामुळें सरकारला करांचें उत्पन्नही अधिक मिळत जातें. म्हणून, सरकारनें भांडवल पुरविणाऱ्या वर्गाच्या योग्य अपेक्षांना उत्तेजन देणें जरूरीचें आहे. सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या कोंबडीला लोभानें ठार मारूं नये, ही शिकवण मला द्यावयाची आहे.

---

**पंढरपूरमध्यें पुन्हा शिधा वांटप**—बार्शी आणि पंढरपूर ह्या गावांत पुन्हां अन्नधान्याची शिधापद्धती अंमलात आणण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ज्या कुटुंब प्रमुखांचें उत्पन्न महिना १५० रुपयांपेक्षां कमी असेल त्यांनाच शिधापत्रकें देण्यांत येणार आहेत, असें समजतें.

**अधिकाऱ्यांचा तुटवडा भरून काढण्याचा उपाय**—हिंदुस्थान सरकारास अधिकारी वर्गाचा तुटवडा भासत असल्याकारणानें उमेदवारांच्या वयाची मर्यादा वाढविण्याचें व २५ ते ४५ वर्षें वयाच्या अनुभवी लोकांना अधिकारी म्हणून घेण्याचें धोरण सरकारनें अंगीकारलें आहे.


-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
--खादीचें माहेरघर--

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:-९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. -एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.- ब्रँच सेक्रेटरी

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## एजन्सी घ्या

संस्थेची प्रगति व एजन्सीच्या उदार शर्ती ह्यामुळें लाभदायक ठरलेली "सह्याद्रि" ची एजन्सी घेऊन आपला आर्थिक प्रश्न सोडवा।

**प्रगतीचा आढावा**
आलेलें काम १ कोटी ९९ लक्ष
मंजूर काम २ कोटी ५३ लक्ष
पूर्ण काम १ कोटी ३० लक्ष
सन १९४७ मधील पूर्ण काम
६० लाखांवर

**यशस्वी मूल्यमापन**
इं. बोनस } हयातीचे विमे रु. ६
} मुदतीचे विमे रु. ५
याशिवाय सर्व प्रकारचे रिझर्व्हज्
राखूनही झालेला निव्वळ फायदा
रु. ५०,०००/-

ह्या संस्थेंतच आपला आयुर्विमा उतरा. सविस्तर माहितीसाठी लिहा.

कचेऱ्या:—दिल्ली, मुंबई, पुणें, बेळगांव, कोल्हापूर, म्हापसें, गोवा, रत्नागिरी, सावंतवाडी, हुबळी, अहमदाबाद, नागपूर, धुळें, इंदोर, हारदा, रायपूर, जबलपूर, अमरावती, कारवार, वगैरे.

गो. ग. सोवणकर, मॅ. डायरेक्टर, सह्याद्रि विमा कं. लि., नासिक.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व ग. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.